दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ९३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.३ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# महाडमध्ये लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीमध्ये स्फोट

**दै.रायगड नगरी । महाड**

**एमआयडीसी-महाड औद्योगिक क्षेत्रातील दुर्घटनाग्रस्त असणारी लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीमध्ये स्फोट झाल्याची घटना घडली. यामुळे संपूर्ण बिरवाडी परिसरातील जनता भयभीत झाली असून स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**




कंपनी शेजारी असणाऱ्या आसनपोई गावातील व बिरवाडी परिसरातील नागरिकांनी त्वरित कंपनीच्या गेटवर धाव घेतली. यावेळी पोलीस प्रशासन देखील घटनास्थळी उपस्थित होते. नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत कंपनी प्रशासनाला विचारणा केली असता कोणतेही ठोस उत्तर देण्यात आले नाही. यामुळे नागरिकांनी कोणतीही जीवित हानी होऊ नये म्हणून कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

मागील वर्षी महापुराने हाहाकार घातलेला असताना देखील त्यावेळी या कंपनीमध्ये स्फोट झाल्याने आपली गावे व घरे सोडून पाच किलोमीटर लांब जाण्याची वेळ स्थानिकांवरती आली होती. अशा प्रकारे या कंपनीमध्ये वारंवार अपघात होत असून येथील स्थानिकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला असताना प्रशासन मात्र कोणतीही कारवाई करताना दिसत नाही.

यामुळे सर्व नागरिकांनी प्रशासन व कंपनी यांना सज्जड दम देऊन नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळणाऱ्या कंपनीला बंद करण्याचे आवाहन केले आहे अन्यथा बिरवाडी पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# खुर्ची शिंदेंना, तिजोरीच्या चाव्या फडणवीसांकडे, गृह-अर्थ खात्याची दुहेरी जबाबदारी?



**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी मुख्यमंत्रिपदाची, तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर शिंदे-फडणवीसांच्या कॅबिनेटमध्ये कोणाकोणाची वर्णी लागणार, याची चर्चा रंगली आहे. फडणवीसांच्या मर्जीतील कोणाकोणाला मंत्रिमंडळात स्थान मिळेल, तर शिंदे गटातील कुठल्या बंडखोराला लॉटरी लागणार, याची उत्सुकता आहे. कोणाला कोणत्या मंत्रालयाची धुरा मिळणार, यावर आता चर्चा झडू लागल्या आहेत. कॅबिनेटमधील दमदार खाती आपल्याकडे ठेवण्याची रणनीती भाजप आखेल, अशी अटकळ आधीपासूनच बांधली जात होती. त्यानुसार अर्थ आणि गृह ही क्रिमी खाती भाजप स्वतःकडेच ठेवेल, असं बोललं जात आहे. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःच अर्थ आणि गृह मंत्रालय सांभाळतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

शिवसेना भाजप युती सरकारच्या काळात मुख्यमंत्रिपदी असलेल्या देवेंद्र फडणवीसांनी गृह खाते स्वतःकडेच ठेवले होते. जेव्हा एकनाथ शिंदेंसोबत भाजप पुन्हा सत्तास्थापनेच्या तयारीला लागलं, तेव्हा फडणवीसच मुख्यमंत्री होणार, अशी चर्चा जोर धरत होती. त्याच वेळी फडणवीस गृह खातेही स्वतःकडेच ठेवण्याच्या शक्यता वाढल्या होत्या. आता जरी फडणवीस उपमुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीत असले, तरी ते गृह खातं स्वतःच्याच ताब्यात ठेवण्याची चिन्हं आहेत. त्यासोबतच अर्थ मंत्रालयाची धुराही तेच खांद्यावर घेण्याचे संकेत मिळत आहेत.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात ही दोन्ही महत्त्वाची खाती राष्ट्रवादीकडे होती. अजित पवार यांनीही फडणवीसांप्रमाणे उपमुख्यमंत्रिपद आणि अर्थ खाते अशी जबाबदारी घेतली होती. तर राष्ट्रवादीच्याच अनिल देशमुख यांच्याकडे गृह खात्याची नाडी होती. मात्र फडणवीस आता अर्थ आणि गृह अशी दुहेरी आणि तितकीच महत्त्वाची जबाबदारी खांद्यावर घेण्याची चिन्हं आहेत. दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील हे शिंदे-फडणवीस मंत्रिमंडळात सहभागी होणार नाहीत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. तर प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, सुधीर मुनगंटीवार, आशिष शेलार, गिरीश महाजन हे फडणवीसांच्या वर्तुळातील नेते कॅबिनेटमध्ये असण्याची शक्यता आहे.

# बेकायदेशीर विक्रीसाठी आणलेला गांजा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीर विक्रीसाठी आणलेला गांजा साठा तळोजा परिसरातून गुन्हेशाखेच्या पथकाने हस्तगत केला आहे

तळोजा कल्याण मार्गावर झोपडपट्टीमध्ये गांजा विक्री करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने त्याठिकाणी सापळा रचला होता. यावेळी पाहणीमध्ये एका झोपडीत दत्ता पवार (२९) हा गांजा विक्री करताना आढळून आला त्याच्याकडून १४ हजार रुपये किमतीचा ५६०ग्राम गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी त्याच्यावर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काळा सोनेरी रंगाचा दगड रेडिओक्टिव्ह स्टोन या नावाने विक्री करण्याचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**


लोकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने काळा सोनेरी रंगाचा दगड रेडिओक्टिव्ह स्टोन या नावाने विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल सत्तार अब्दुल रहीम (वय ५२ राहणार कर्नाटक) व मोहम्मद तनवीर शब्बीर खान (वय ३२ राहणार तेलंगणा) अशी दोघांची नावे आहेत.

काळ्या सोनेरी रंगाचा दगड रेडिओक्टिव्ह स्टोन या नावाने विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबई यांना मिळाली होती. त्यानुसार पार्थ हॉटेल, सेक्टर ६, कामोठे येथे पोलिसांनी सापळा रचला. यावेळी पार्थ हॉटेल समोर येणाऱ्या रस्त्यावर दोन इसम पायी चालत असताना दिसून आले. त्यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे काळ्या सोनेरी रंगाचे दगड सापडून आले. यावेळी त्यांनी हे दगड विक्री करण्यासाठी आणले असल्याचे सांगून हे दगड रेडियो एक्टिवा या नावाने मोठ्या रकमेत विक्री करून फसवणुकीच्या इराद्याने आणले असल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी दोन्ही आर-ोपींना दगडांसह अटक केली.

# दिघी पोर्ट होणार देशातील सर्वात मोठे बंदर अदानी कडून क्षमतावाढीसाठी पर्यावरण खात्याकडे नवा प्रस्ताव

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

रायगड जिल्ह्यातील राजपुरी खाडीच्या दोन बाजुस वसलेल्या दिघी पोर्टची सध्याची मंजुर वार्षिक मालहाताळणी क्षमता केवळ २३.६५ दशलक्ष मेट्रिक टन आहे. दिघी पोर्टचे नवे विकासक असलेल्या अदानी उद्योग समुहाने ही क्षमता वार्षिक १४० दशलक्ष मेट्रिक टन इतकी वाढवण्याचे प्रस्तावित केली आहे. सध्या दिघी पोर्ट मधुन स्टील व कोळसा व बॉक्साइट इत्यादी ची हाताळणी होत आहे.



विस्तारानंतर वाहने, प्रोजेक्ट कार्गो, खते पेट्रोलियम पदार्थ, एलएनजी, क्रायोजेनिक गॅस, बल्क कार्गो यांसारख्या मालाची हाताळणी होऊ शकेल. वार्षिक १४० दशलक्ष मेट्रिक टन क्षमता स्थापित झाल्यावर दिघी पोर्ट हे देशातले सर्वात मोठे बंदर बनेल. सध्या केवळ मुंद्रा पोर्ट मध्येच एवढी माल-हाताळणी क्षमता आहे. जेएनपीटी ची वार्षिक माल हाताळणी ६८.५ दशलक्ष मेट्रिक टन इतकी आहे. सध्या दिघी पोर्ट मध्ये दिघी व आगरदांडा मिळुन ३२५ मीटर लांबीचे सहा बर्थ आहेत. क्षमतावाढीसाठी ६१७५ मीटर लांबीचे १८ बर्थ नियोजित आहेत.

सध्या दिघी पोर्ट कडे १०४ हेक्टर जमीन असुन अधिक ३०४ हेक्टर सपाट जमिन तयार केली जाणार आहे. यासाठी खाडी मुखाजवळील ११४ दशलक्ष घनमीटर एवढा गाळ उपसुन किना-यालगतच्या पाण्यात त्याचा भराव करून सरळ रेषेत बंधारे घा-तले जाणार आहेत. गाळ उपसुन मोठ्या जहाजांच्या वाहतुकीसाठी मार्ग तयार केला जाईल व खाडीकिनारी भराव करून बर्थसाठी योग्य जागा तयार केली जाईल. माल हातळणी करताना समुद्री लाटांमुळे जहाजे हलु नयेत म्हणुन लाटा थोपवण्यासाठी ब्रेक वॉटर वॉलचा देखील यात समावेश आहे. तसेच क्षमता वाढीमध्ये रस्ते व रेल्वे जोडणी यांचा देखील समावेश आहे.

दिघी पोर्ट विस्तारासाठी वरील .../२

# उद्धव ठाकरेंचे मेहुणे श्रीधर पाटणकर यांना दिलासा



**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकाबाजूला सत्ता गमावल्यामुळे उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला. तर दुसरीकडे सीबीआय आणि ईडीच्या रडारवर अस-लेले उद्धव ठाकरे यांचे मेहुणे श्रीधर पाटणकर यांना एका प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे.

सबळ पुरावे उपलब्ध नसल्याचा सीबीआयनं सादर केलेला क्लोजर रिपोर्ट कोर्टानं अखेर स्वीकारला आहे. विशेष म्हणजे या क्लोजर रिपोर्टला ईडीचा विरोध होता. तरीही कोर्टानं रिपोर्ट स्वीकारुन पाटणकर यांना मोठा दिलासा दिला आहे.

ईडीने युनियन बँकेचे अधिकारी, काही ज्वेलर्स आणि पुष्पक बुलियन कंपनीचे संचालक यांच्याविरोधात ८४.६ कोटींच्या कथित घोटाळ्याप्रकरणी मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल करत तपास सुरू केला होता.

याप्रकरणी ईडीनं कारवाई करत श्रीधर पाटणकर यांची साडे सहा कोटींची मालमत्ता जप्त केली होती. पण ईडीच्या विरोधानंतरही काल विशेष सीबीआय कोर्टानं सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे.

# महाड तालुक्यातील बाहुली गावात जमिनीला भेगा



**दै.रायगड नगरी । महाड**

किल्ले रायगडाच्या पायथ्याच्या बाहुली गावात सुमारे एक किलो मीटरपेक्षा जास्त लांबीच्या ओसाड जमिनीवर गावानजीक भेगा गेल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाली असून रात्री उशिरा याठिकाणी तहसीलदार व डीवायएसपी यानी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांना धीर दिला. शनिवारी सकाळी प्रांताधिकारी प्रतिमा पुद्दलवाड भूगर्भीय शास्त्रज्ञांसमवेत गावाला भेट देत परिस्थितीची पाहणी केल्याचे ग्रामस्थ चंद्रकांत महाडिक यांनी सांगितले.

या संदर्भात प्रस्तुत प्रतिनिधीला माहिती देताना चंद्रकांत महाडिक यांनी स्पष्ट केले की सायंकाळी उशिरा गावाच्या उगवत दिशेला शेवंताबाई कडू यांच्या ओसाड शेतजमिनीतील सुमारे एक किलोमीटर लांबीच्या भेगा गेल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यावर त्याची तातडीने माहिती स्थानिक प्रशासनाकडे देण्यात आली. ही माहिती समजताच तहसिलदार सुरेश काशीद, नायब तहसीलदार प्रदीप कुडळ यांनी पोलीस उपअधिक्षक नी-लेश तांबे यांच्यासमवेत रात्री उशीरा अकरा वाजता भेट देऊन प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला. बाहुली गावांची संख्या सुमारे दोनशे आहे.या गावांना जोडणार्या छोट्या पुलांबाबत गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या मागणीपैकी सांदोशी गावाकडे जाणार्या मार्गावरील पुलाची निर्मिती अद्याप झालेली नाही. मात्र वारंगी निजामपूर या गावांना जोडणारा पूल बांधून तयार झाल्याने गावांतील विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना शाळेमध्ये जाणे शक्य होणार असल्याचे श्री महाडिक यांनी स्पष्ट केले.

या झालेल्या घटनेची गंभीर दखल स्थानिक प्रशासनाने घेतली असून ग्रामस्थांशी संवाद साधून संबंधित गावातील ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी हलविण्याबाबतचा निर्णय होणार आहे. सांगण्यात आले असले तरीही गावालगत जमिनी वरील सरळ मार्गावर गेलेल्या या भेगांमुळे नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्या संदर्भात भूगर्भीय शास्त्रज्ञांच्या अहवालानंतरच निर्णय होईल असे सांगण्यात आले आहे.

तीन दिवसांपूर्वीच महाड तालुक्याच्या वरंध घाटामध्ये झालेल्या दरड कोसळण्याच्या तर दुसर्या दिवशी तरतुदी मार्गावरील दरड कोसळण्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर रायगड विभागात झालेल्या या घटनेने तालुक्याच्या चालू वर्षीच्या पावसाळ्यात नैसर्गिक आ-पत्तीला सुरूवात झाल्याचीही चर्चा सुरू झाली असून प्रशासनाकडून आपत्तीसंदर्भात तातडीने उपाययोजना केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# विविध पिके घेण्यास कर्जत तालुक्याची भौगोलिक परिस्थिती योग्य : विक्रम देशमुख

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'कर्जत तालुका मुंबईच्या जवळ आहे. शेती उत्पादनासाठी बाजारपेठ जवळ आहे. कर्जत तालुक्यातील बऱ्याचशा भागात उन्हाळी पिके घेण्यासाठी पाणीही उपलब्ध आहे. पण हल्ली युवक शेती करण्यासाठी पुढे येत नाहीत. त्यांनी यामध्ये लक्ष घातल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. जमिनी विकण्यापेक्षा त्यातून विविध पिके कशी घेता येतील. याकडे आपण सर्वांनी पाहिले पाहिजे. आपल्या तालुक्यातून आदिवासी ग्रामस्थ दररोज तुळशी घेऊन दादरच्या फुल बाजारात जातात. त्याच प्रमाणे अन्य पिकेही थेट बाजारात घेऊन जाणे परवडणारे आहे कारण तालुक्याची भौगोलिक परिस्थिती त्या योग्य आहे.' असे महत्वपूर्ण प्रतिपादन तहसीलदार विक्रम देशमुख यांनी येथे केले.



रायगड प्रेस क्लब संचलित कर्जत प्रेस क्लबच्या वतीने कृषी दिनाचे औचित्य साधून 'शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सन्मान' या संकल्पनेतून आदर्श शेतकरी पुरस्काराचे आयोजन वदप येथील श्री मारुती मंदिराच्या सभागृहात करण्यात आले होते. तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले होते. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी चिंतामण लोहकरे, प्रदेशिक कृषी केंद्राचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, जेष्ठ शेतकरी विठ्ठल शिंदे, सल्लागार विजय मांडे उपस्थित होते.

कार्याध्यक्ष श्रीकांत हाबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्ष ॲड. राहुल देशमुख यांनी प्रास्ताविकात उपक्रमाचा उद्देश सांगितला. त्यानंतर ॲड. अजित विठ्ठल पाटील, वदप आणि हेमंत नामदेव कोंडीलकर यांना व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह, तुळशीचे रोप देऊन आदर्श शेतकरी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पाटील आणि कोंडीलकर यांनी आपल्या मनोगतातून शेतीतील नव नवीन प्रयोग केल्यानंतर चे अनुभव कथन केले. प्रगतशील निलिकेश दळवी यांनी, 'तरुणांनी शेती व्यवसायात उतरल्यास विविध प्रयोग करून शेती व्यवसायात आमूलाग्र बदल होऊ शकतो.' असे स्पष्ट केले.

कृषी अधिकारी शितल शेवाळे आणि चिंतामण लोहकरे यांनी शासकीय योजना सांगून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा. तसेच ड्रीम सिडर आणि एस आर टी ची अवजारे वापरा त्यांच्यावर शासनाकडून ५० टक्के अनुदान मिळते. त्याचा लाभ घ्या.' असे आवाहन केले. डॉ. रविंद्र मर्दाने यांनी, 'भात हे आपल्या जेवणातील मुख्य अन्न आहे. प्रादेशिक कृषी केंद्रात .../२

# उरणात सर्दी खोकला तापाचा प्रादुर्भाव

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाळ्याला सुरुवात झाल्यानंतर उरण तालुक्यात सर्दी, खोकला, ताप, काविळ, जुलाब, पोट दुखी, चक्कर सारख्या आजारात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. तसेच उरण शहर व ग्रामीण भागातील गावात गॅस्ट्रोचे रुग्ण आढळून येत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

उरण तालुका हा अरबी समुद्राच्या कुशीत वसलेला तालुका या तालुक्यात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असतो. सध्या पावसाने दमदार सुरूवात केली आहे. त्यामुळे दुषित पाणी, हवेतील गारवा यामुळे सध्या सर्दी, खोकला, ताप, काविळ, जुलाब, पोट दुखी, चक्कर येणे सारख्या आजारांनी डोके वर काढले आहे.

त्यामुळे या आजारांनी त्रस्त झालेले रुग्ण खाजगी, शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी गर्दी करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.त्यातच शहरात व ग्रामीण भागातील गावात गॅस्ट्रोचे रुग्ण ही आढळून येत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

तरी रुग्णांनी घाबरून न जाता जेवणापूर्वी आपले हात स्वच्छ धुवावेत, पाणी गरम करून पिण्यास घ्यावे, उघड्यावरचे पदार्थाचे सेवन करणे टाळावे,आप आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच वैद्यकीय अधिकारी, डॉक्टरांचा सल्ला घेऊन आप आपल्या आजारांवर उपचार करुन वेळच्या वेळी औषध घ्यावे असे आवाहन सध्या डॉक्टर वर्गाकडून करण्यात येत आहे.

# दुर्ग रक्षक फोर्स महाराष्ट्र संस्थेची जेजुरी मल्हार गडावर स्वच्छता मोहीम

**दै.रायगड नगरी । माथेरान**



महाराष्ट्रातील गडकोट किल्ले पर्यटन स्थळ बनले आहेत असले तरी त्यांचे संवर्धन आवश्यक आहे. यांच विचारातून दुर्ग रक्षक फोर्स महाराष्ट्र च्या कार्यकर्त्यांनी गडकिल्ले स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत जेजुरी आषाढी वारी वारकरी दिंडीचे औचित्य साधुन जेजुरी मल्हार गड येथे स्वच्छता करण्यात आली.माझा गड ,माझा अभिमान मोहिमे अंतर्गत गडावरील प्लॅस्टिक बाटल्या,खाऊचे पुडे, कचरा गोळा करून स्वच्छता एकदिवसीय स्वच्छता मोहिमेतून कचऱ्याच्या २२ बॅग जमा करण्यात आले.

याद्वारे प्रत्येक महिन्याला महाराष्ट्रातील एका गडाला भेट देऊन शिवविचारांचे आणि गड –किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी गडावर माझा गड माझा अभिमान अशी स्वच्छता मोहीम राबवून आलेल्या पर्यटकांमध्ये गड स्वच्छतेविषयी जनजागृती करीत आहेत.दुर्ग रक्षक फोर्स महाराष्ट्र चे संस्थापक अध्यक्ष जयकांत शिंक्रे, वर्षा चासकर, अशोक खांडेकर, आरती सु–लगेवार , जानवी हेमंत एडवणकर, अमृता काशिद, योगेश अशोक गायकवाड, स्व–ाती मोरे, सचिन वाघ पाटील, यश खंदारे, अविष्कार यादव, गोविंद संजय सुर्यवंशी, अमित पवार, स्वप्नाली वारंगे, युवराज पाटील, राजेंद्र पोतदार , अतिश मोहिते, पूनम अतिश मोहिते, त्रिशा अतिश मोहिते, विकास लोहोट, अखिलेश अनंत वारंगे, अपर्णा अनंत वारंगे, अनंत महादू वारंगे, साक्षी चव्हाण यांच्यासह २४ कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. दुर्ग रक्षक फोर्स महाराष्ट्र च्या कार्यकर्त्यांनी जेजुरी पायथा मल्हारगड येथे स्वच्छता मोहीम राबवली, यामोहिमेविषयी माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष जयकांत शिंक्रे यांनी सांगितले की तरुण मुलांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार रुजवण्याबरोबरच त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा असलेले किल्ले स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आम्ही गडावर स्वच्छता करतो. पर्यटकांकडून किल्ल्याच्या परिसरात टाकलेल्या प्लास्टिक पाण्याच्या बाटल्या खाऊचे पुडे, इत्यादी जमा झा–लेला कचरा गोळा करून गडावरून खाली घेऊन त्यांची विल्हेवाट लावत असल्याचे जयकांत शिंक्रे यांनी सांगितले.

# पाणदिवेचा सुपुत्र जितेंद्र पाटील यांचा भारत श्रीमान किताब स्पर्धेत टॉप ६ मध्ये येण्याचा बहुमान

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील शरिर सौष्ठव स्पर्धेतील उगवता तारा म्हणून चर्चेत असलेले जितेंद्र गन्नाथ पाटील यांनी शरीर सौष्ठव स्पर्धेत अनेक पदके, बक्षीसे जिंकली आहेत.आता या बक्षीस, किताबमध्ये आणखीन एका आनंदाची भर पडली असून द मेट्रो फ्लेक्स जिम बैंगलोर – (कर्नाटक) येथे नॅशनल बॉडी बिल्डिंग आणि चॅम्पियनशिप २०२२–२३ मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत उरणच्या पाणदिवे गावातील जितेंद्र पाटील यांनी या स्पर्धेत भारत केसरी श्रीमान (४० ते ५० या गटामध्ये) टॉप ६ मध्ये येण्याचा बहुमान मिळविला आहे.

यापूर्वी जितेंद्र पाटील यांनी अनेक शरिर सौष्ठव स्पर्धेत भाग घेऊन रायगड श्री, गुरुकूल श्री. द्रोणागिरी श्री, महाराष्ट्र श्री असे अनेक किताबे पटकाविली आहेत. जितेंद्र गन्नाथ पाटील यांची स्वतःची पाणदिवे येथे रायगड हेल्थ सेंटर नावाची जीम आहे. स्वतः ची जीम असल्याने जितेंद्र पाटील हे भरपूर सराव करतात.त्यामुळे त्यांना हे यश गाठता आले आहे.त्यांच्या या यशाबद्दल जितेंद्र पाटील यांच्या नातेवाईकांनी, मित्र परिवार, शुभचिंतक, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे कौतुक केले आहे.

त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. मला घरातील सर्व मंडळीचे, नातेवाईकांचे, आणि मित्र परिवाराचे चांगले सहकार्य लाभले. मला या स्पर्धे साठी माझे गुरु सुदर्शन खेडेकर आणि विकी पाटील(कळंबुसरे) यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच स्पर्धे ठिकाणी (बेंगलोर) येथे प्रांजळ पाटील, प्रशांत पाटील, किरण केदारे यांची अमूल्य अशी साथ लाभली या सर्वामुळेच मी टॉप ६ मध्ये आल्याची कृतज्ञतेची भावना जितेंद्र पाटील यांनी व्यक्त केली आहे.


श्री.मुजावर सो.कोर्ट

**प्रो.जमा ६–२५** **अर्जदाराचे वकील**

**ॲड.विजय गणेश गडगे, ॲड.सागर गोंधळी**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.६६०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०७/२०२२

१) श्रीमती.शेवंती जनार्दन कोळी
वय : ६० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.मनोज जनार्दन कोळी
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.मयुर जनार्दन कोळी
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी कै.महादेव मंगळ्या उर्फ कमळ्या कोळी हे दि.१९/०१/१९९७ रोजी मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाचे घर मिळकतीचे मालमत्ता पत्रक आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**नगर भूमापन क्रं.१२४, क्षेत्र १५.४० चौ.मी., धारणाधिकार–अ, मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.महादेव मंगळ्या उर्फ कमळ्या कोळी ह्यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.४/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.गुन्नाल साहेब कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.स्वानंद भा. नवाळे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.८५९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०८/२०२२

श्रीमती.सोनाली रामचंद्र शिंदे वगैरे अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील सदनिका नं.बी–४०२, चौथा मजला, बी विंग, लाभेश्वर प्रथम, प्लॉट नं.११७ व ११८, सेक्टर १४, क्षेत्र ३२.९१० चौ.मी. (कारपेट) पनवेल, रायगड–४१०२०६**

कै.रामचंद्र बापू शिंदे हे दि.१६/११/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र.१) श्रीमती.सोनाली रामचंद्र शिंदे, २) कुमारी ज्योती रामचंद्र शिंदे, ३) कुमार सत्यजित रामचंद्र शिंदे, सबब अर्जदार हेच कै.रामचंद्र बापू शिंदे यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.रामचंद्र बापू शिंदे यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालयात योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.२/७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## दिघी पोर्ट होणार देशातील सर्वात मोठे बंदर

सर्व कामांचा मंजुरी प्रस्ताव अदानी समुहाने केंद्रीय पर्यावरण खात्याकडे सादर केला आहे. विस्तार करताना एकीकडे खाडीतुन गाळ काढुन खोली वाढवण्यात येईल व त्याचबरोबर खाडीलगत भराव करून पाण्याचा भाग जमिनीत रूपांतरित केला जाणार आहे. म्हणजेच भरावामुळे विस्थापित होणारे पाणी तिथेच खोलीत सामावले जाऊ शकते. परंतु खाडीकिनारी गावातील लोकांचे कांदळवनांचे अस्तित्व व भरावामुळे उधाणाचा काही धोका होईल का याबाबत साशंकता व्यक्त केली आहे.

दिघी पोर्ट क्षमतावाढीमुळे लॉजिस्टिक्स, वेअरहाउस, कोल्ड स्टोरेज यातील रोजगार नक्की वाढेल परंतु किती कालावधीत मंजुरी मिळते व पुढील काम होते यावर सर्व अवलंबून आहे. मुंबई बंदरातील व्यापार मोदी सरकारने गुजरातला हलवल्याची टीका माध्यमातून वारंवार केली जात होती. दिघी पोर्ट विस्तारामुळे बंदरातील व्यापाराचा मोठा हिस्सा पुन्हा महाराष्ट्राला मिळु शकेल व केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेचा उद्देश सफल होणार आहे.

## विविध पिके घेण्यास कर्जत तालुक्याची भौगोलिक परिस्थिती योग्य : विक्रम देशमुख

विविध भाताच्या जाती विकसित केल्या जतात. त्यांचे पीक घेतल्यास उत्पन्नात निश्चित वाढ होईल. असे सांगितले. सूत्र संचालन विलास श्रीखंडे तर आभार प्रदर्शन भूषण प्रधान यांनी केले.

या प्रसंगी कृषी विस्तार अधिकारी अभिजीत खैरे, देविदास राठोड, प्रगतशील शेतकरी यशवंत गायकवाड, नैनेश दळवी, रमेश चव्हाण, दशरथ मुने, अनिल देशमुख, खंडू शिंदे, भगवान चव्हाण, जगदीश पाटील, कृष्णा चव्हाण, जानू मराडे, परम पाटील, श्रीकांत पोटील, परम पाटील, अजय गायकवाड, मल्हार पवार, ज्ञानेश्वर बागडे, गणेश पवार, गणेश मते, गणेश पुरवंत, समीर एरूणकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर डे साजरा

**दै.रायगड नगरी । मुरुड**

राष्ट्रीय डॉक्टर दिवस निमित्ताने ॅटिकरप्शन ऑफ इंडिया मुरुड शाखेच्या वतीने ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. ॲटिकरप्शन फाऊंडेशन ऑफ इंडियाचे डिस्ट्रिक्ट चिफ इंचार्ज रुपेश दांडेकर, डिस्ट्रिक्ट डव्हायझर अमोल शेडगे, एक्झिक्युटिव्ह मंगेश कौलकर, राहुल कासार मान्यवर यावेळी उपस्थित होते. कोरोना महामारीच्या काळात आपली व आपल्या कुटुंबियांची पर्वा न करता येथील डॉक्टर व हॉस्पिटल स्टाफ यांनी आपले कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडले.


Gunnal Saheb Court
Adv. Meghana Nimbalkar

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.)
PANVEL AT PANVEL

M.A. NO. 966/2022
Exh. No. 8/D
N.D. 08/08/2022

1. Mrs. Rajani Rajeshwar Kotwal
Age. 82 Years, Occupation : Nil
2. Apurva Arun Kotwal
Age 27 Years , Occupation
3. Miss. Sayali Arun Kotwal
Age. 27 Years, Occupation
4. Abhishek Arun Kotwal
Age. 24 Years, Occupation
All R/ at Flat No. A/104,
Vaibhavshali CHS., Plot. 05,
Sector – 11, Kharghar 410210 Applicants

That late Mr. Arun Rajeshwar Kotwal was the son of applicant no. 1 & husband of applicant no. 02 & father of applicant no. 03 & 4 who expired on 05/10/2020 at K. J. Somaiya Hospital. The Property Description standing in the name of deceased is Attached herewith

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

**Name of the property Holder : Late Mr. Arun Rajeshwar Kotwal & Mrs. Apurva Arun Kotwal**

**1. Flat No. A/104, On 1ST floor , 'A' Wing Vaibhavshali CHS., Plot. 05, Sector – 11, Kharghar 410210 , Tal. Panvel & Dist – Raigad**

**Agreement Value Rs. 40,00,000/- (Rupees Forty Lakhs Only)**

**( For 50% Share)**

**2. Flat No. 402 on 4TH Floor , building name GOVIND CHHAYA, Plot no. 30, Navade Phase 2, Tal – Panvel & Dist – Raigad**

**Agreement Value Rs. 31,21,000/- (Rupees Thirty One Lakhas Twenty One Thousand Only)**

**( For 50% Share)**

Whereas the above named applicants have filed present misc. application for heirship certificate under Bombay Regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel.

You the member of public are hereby given notice to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in the person or pleader duly instructed and to file your say / objections if any notice within 30 days from the date of publication of public notice, Failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 02 day of july 2022

Sd/- Jr. Clerk C.C.S.D. Panvel (Court Seal) Sd/- Asst.Superitendent C.C.S.D. Panvel



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत श्री.अशोक बाळाराम पाटील यांचे मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन क्रं. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| २६ | २/ब/१ | भो वर्ग १ | ०–४४–४० पो.ख. ०–०३–५० एकूण ०–४७–९० पैकी ०–२०–०० | ७.८५ |

उपरोक्त मिळकत आमचे अशिलाने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्रीचा करार, मक्ता, रस्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ.कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार वकील यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून मी सदर मिळकतीचा व्यवहार माझे अशिल पूर्ण कररतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/०७/२०२२

**सही/–**
**ॲड.विशाल दत्ता भोपी**
**वकील, उच्च न्यायालय**
**पत्ता : घर नं.२४३, सदाशांती निवास आकुर्ली, मालेवाडी, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९०८२०३८९६०**



Hon'ble mujawar Judge
Process paid Rs. 50/-
Adv. Ratnesh K. Mishra

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF A.M. MUJAWAR JOINT CIVIL JUDGE SENIOR DIVISION, PANVEL AT- PANVEL

CIVIL M.A. NO. 632/2022
Exh : 8/D
N.D. 18/07/2022

1) MR. PAVAN KUMAR YADAV
Age : 43 years, Occu : Business
2) MRS. BIMLA DEVI
Age : 62 years, Occu : House wife
Both having address at B- 305,
Indra darshan Plot No. 186,187,190,
191 Sector No. 09, New Panvel
Raigarh Maharashtra-410206 Applicants
V/s
Nil Opponent

That Late MR. BIR SINGH YADAV was the father of applicant No.01 and husband of applicant No. 02 who expired on 22/09/2020 Karnawas, Rewari , Rewari , Haryana – 123401 The property description is in the name of deceased are attached herewith

If anyone has right, title, share, claim in the property they should appear in person or through their advocate within the 15 days of the date of publication of this notice. If no one appear and objects the application, Then this court will be pleased to proceed to pass the necessary order in favour of the Applicants.

**SCHEDULE OF PRPERTY**

**WING B, FLAT NO. 305, ON 3rd FLOOR , INDIRA DARSHAN PLOT NO. 186,187,190 & 191, SECTOR–09, NEW PANVEL TAL-PANVEL, DIST– RAIGAD, MAHARASHTRA- 410206 AREA ADMEASURING 548.00 SQ.FTS. CARPET AREA WITH ATTACHED OPEN RERRACE ADMEASURING 424.00 SQ.FTSCARPET AREA WITHIN THE LIMITS NAVI MUMBAI MUNCIPAL CORPORATION**

Whereas the above name ed Appliacnts have filed an application for the grant of heirship certificate under the Bombay Regulation Act VII before SHRI. A. M. MUJAWAR JOINT CIVIL JUDGE SENIOR DIVISION THANE.

You the member s of the public are hereby givennotice to appear in the court of SHRI. A. M. MUJAWAR JOINT CIVIL JUDGE SENIOR DIVISION THANE in person or by pleader duly instructed and to file your say / objections if any within the 15 days from the date of publication of public notice, failing wich the said application will be held presuming that there is no objection from anybody and application will be finally decided.

Given under my habd and seal this day of 02 july 2022

Sd/- Jr. Clerk C.C.S.D. Panvel (Court Seal) Sd/- Asst.Superitendent C.C.S.D. Panvel



**ॲड.ज्ञानेश्वर श्री.कुळकर्णी**
**अर्जदारांचे वकील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.तिसरे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.९९३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०९/२०२२

कै.प्रभाकर धाकोजी पवार मयतचे वारस
१) श्रीमती.प्रमोदिनी प्रभाकर पवार
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रबोध प्रभाकर पवार
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ व २ सर्व रा.पिएल–५/३०/५,
सेक्टर १७, न्यू पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ही कै.प्रभाकर धाकोजी पवार यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे. कै.प्रभाकर धाकोजी पवार यांचे दि.२५/०२/२०१५ रोजी सुखम हॉस्पिटल–जसदनवाला कॉम्प्लेक्स, विश्राळी नाका, जुने पनवेल–४१०२०६ येथे निधन झाले असून श्रीमती.प्रमोदिनी प्रभाकर पवार व इतर १ ह्यांनी कै. प्रभाकर धाकोजी पवार यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पीएल–५/३०/५, पहिला मजला, बिल्डींग नं.पी. एल.५/३०, प्लॉट नं.१७/७, सेक्टर १७, गट नं.२६७/१, नवीन पनवेल क्षेत्र ३३.२० चौ.मीटर, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकत ही कै.प्रभाकर धाकोजी पवार यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.प्रमोदिनी प्रभाकर पवार व इतर १ हे कै.प्रभाकर धाकोजी पवार यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाी व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.प्रमोदिनी प्रभाकर पवार व इतर १ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवही करेल आणि ते जर कै.प्रभाकर धाकोजी पवार यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०२/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## चौक बाजारपेठेतील रस्त्यांची दुरावस्था



**दै.रायगड नगरी । चौक**

पावसाळा उशिराने सुरू झाला असला तरी जुलै महिन्यापासून पावसाने जोर धरला आहे.येत्या दिवसात जोरदार पाऊस पडणार असल्याचे दिसून येत आहे चौक– मुंबई –पुणे जुना महामार्ग किती वर्ष नुतनीकरणाची वाट पाहत असताना सार्वजनिक बांधकाम खात्याने चौक गावातील काँक्रिटीकरणाचा रस्ता गावातील तीन घर पासून डाग बंगला आणि गावाबाहेरील तारापूर ते हनुमान मंदिर इथपर्यंत निधी अभावी पूर्ण केला नसून मुख्य बाजारपेठेत हा रस्ता होऊ शकला नाही. यामुळे येथे सार्वजनिक बांधकाम अधिकारी व ग्रामस्थांच्या मोठा वाद झाला होता. या पावसाळ्यापूर्वी हा मार्ग पूर्ण होणे गरजेचे होते. त्यामुळे रस्त्यालकाचे गटार होऊ शकले नाही.परंतु गटारातील साफसफाई सुद्धा करणे गरजेचे होते. चौक मुख्य बाजारपेठ असल्या मुळे येथे अनेक नागरिक खरेदी करण्यासाठी येत असतात त्यातच जवळच हायस्कूल, कॉलेज, प्राथमिक शाळा, याच परिसरात असून शासकीय कार्यालय, रुग्णालय याच भागात अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे या भागात रस्त्यावरून अनेक विद्यार्थी,कामगार ये –जा करीत असताना येथील रस्त्यावर पावसामुळे अनेक मोठमोठाले खड्डे पडले असून त्यात पावसाचे पाणी सा–चून त्यातील घाणेरडे पाणी गाड्या जात असताना शालेय विद्यार्थी नागरिक यांच्या अंगावर उडत असते नागरिकांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात हाल होत असतात. या खड्ड्यांच्या डागडुजी साठी संबंधित किंवा ग्रामपंचायत यांनी हे खड्डे भरून घेण्यात यावे अशी येथील नागरिकांची मागणी आहे. काही दिवसापूर्वी असेच खड्डे साई हॉस्पिटल जवळ पडले असताना त्यातून लोखंडी सळ्या बाहेर पडल्या होत्या त्या भरून घेण्यासाठी येथील स्थानिक कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायतकडे अर्जाद्वारे मागणी केली होती.ग्रामपंचायतने पडलेले खड्डे भरून सहकार्य करण्याची विनंती येथील नागरिक करीत आहेत

# माणगाव येथे कृषी दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

महाराष्ट्र शासन तालुका कृषी विभाग माणगाव व पंचायत समिती माणगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक यांचे जयंती निमित्ताने १ जुलै रोजी कृषी दिन पंचायत समिती माणगाव येथे साजरा करण्यात आला.

यावेळी बी. व्ही. काप कृषि अधिकारी यांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रास्ताविक केले, उपस्थित शेतकऱ्यांना कृषि दिनाचे महत्व व पंचायत समिती अंतर्गत कृषि विभागाचे विविध योजना याबद्दल माहिती दिली, तसेच श्री आर डी पवार तालुका कृषी अधिकारी माणगाव यांनी दिनांक २५ जून ते १ जुलै रोजी कृषी संजीवनी मोहिमेअंतर्गत तालुक्यांमध्ये ११० गावांमध्ये व १६६७ शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्यात आले तसेच भात लागवड तंत्रज्ञान, खत बचत, पोष्टिक तृणधान्य नाचणी, महिला शेतकरी सबलीकरण, प्रगतशील शेतकरी संवाद, कृषी पूरक व्यवसाय इत्यादी उपक्रम राबविण्यात आल्याचे सांगितले. मा.गट विकास अधिकारी श्री. वाय. एम. प्रभे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करण्याबाबत मार्गदर्शन केले, यामध्ये कलिंगड, हळद,आले, स्टोबेरी इत्यादी नवीन पिकांची लागवड करून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याबाबत प्रतिपादन केले. तसेच कृषी विभाग व पंचायत समिती हे शेतकऱ्यांच्या पूर्णपणे पाठीशी असल्याबाबत आश्वासनही दिले. तसेच कृषी दिना वेळी तालुक्यातील सन २०२१–२२ या वर्षातील भात पीक स्पर्धेतील विजेते श्री बापू बक्कम कोशिंबळे (प्रथम), श्री सोमनाथ पास्टे, मुर(दुत्तीय) श्री. श्रीकांत हाटे,नागाव (तृतीय), व तालुक्यांमध्ये नाचणी पिकामध्ये विक्रमी उत्पादन घेणारे श्री.राजू तेलंगे मौंजे कुंभे यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आत्मा अंतर्गत नवीन नोंदणी करण्यात आलेल्या नवतरुण शेतकरी गट, दहीवली या गटाला नोंदणी प्रमाणपत्र देण्यात सन्मानित करण्यात आले. तसेच तालुक्यातील महिला शेतकरी गट यांना परसबागेतील भाजीपाला लागवड करण्यासाठी भाजीपाला बियाणे किट वाटप करण्यात आले, या नंतर मा.गट विकास अधिकारी श्री. वाय. एम. प्रभे यांच्या हस्ते कृषी दिनानिमित्ताने पंचायत समितीचे आवारामध्ये वृक्ष लागवड करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी कृषी विस्तार अधिकारी बी. व्ही. काप, अशोक मार्कड विस्तार अधिकारी, श्री. प्रमोद शिंदे तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा, मंडळ कृषी अधिकारी गोरेगाव श्री किरण पडळकर, व कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.



# महापालिकेच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचा मे.दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनशी करार

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल क्षेत्रातील अनेक मुलांमध्ये क्रिकेटचे टॅलेंट आहे. परंतू त्यांना व्यासपीठ नाही, पनवेल महापालिकेमुळे हे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. भविष्यात येथील मुलेही भारतीय क्रिकेट टिममध्ये खेळू शकतील, असा विश्वास विख्यात क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केले.

